# संस्कृतभाषासंस्था

**संस्थापक - श्री. ग. वा. करंदीकर**
ए-४०२, शांति अपार्टमेंट, महाकाली नगर,
विद्यालय मार्ग, मुलुंड (पूर्व), मुंबई - ४०००८१.
दूरभाष : २५६३२२५३

**अध्यक्षा - सौ. सुरेखा नरेंद्र जोशी**
पितृछाया, २रा मजला, सखाराम कीर रोड,
माहीम, मुंबई - ४०००१६.
दूरभाष : २४३०६७३६ / ९८६९६११८२८

दिनांक : ११ जून २०११

## विषय : भगवद्गीता-श्लोक-पठण-स्पर्धा

श्रीमद्भगवद्गीता म्हणजे भारताचा अनमोल सांस्कृतिक ठेवा आहे. प्रत्यक्ष श्रीकृष्णाने सांगितलेल्या तेजस्वी विचारांची आबालवृद्धांना तोंडओळख व्हावी म्हणून संस्कृतच्या प्रचारासाठी व प्रसारासाठी सतत कार्यरत असलेल्या संस्कृतभाषासंस्थेतर्फे ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

कित्येक भारतीयांच्या मनात असे शल्य असते की, या धकाधकीच्या व धावपळीच्या जीवनामुळे भगवद्गीता वाचणे व पाठ करणे राहून जाते. या स्पर्धेत भाग घेतल्याने हे शल्य काही प्रमाणात दूर होईल. अशी आशा आहे.

भगवद्गीतेतील सहजसोपे व सुंदर अर्थपूर्ण श्लोक पाठ केल्याने व मोठ्याने म्हटल्याने स्मरणशक्ती व उच्चारणक्षमता निश्चितच वाढेल. वाणी स्वच्छ व सुंदर होईल. तरी सर्वांनी या स्पर्धेत भाग घ्यावा, अशी आमची मनापासून इच्छा आहे.

**या स्पर्धेसाठी खालीलप्रमाणे गट केले आहेत.**

१) प्रथम गट - इयत्ता ५ वी ते ७ वी
२) द्वितीय गट - इयत्ता ८ वी ते ९ वी
३) तिसरा गट - महाविद्यालयीन गट
४) चौथा गट - संस्कृतप्रेमीगट (खुला गट)

- स्पर्धेचे परीक्षा शुल्क - रू. १०/-
- या स्पर्धेसाठी भगवद्गीतेच्या पहिल्या अध्यायातील क्रमांक १ ते २५ श्लोक पाठ करून एकानंतर एक सलगपणे, शुद्ध, स्पष्ट म्हणून दाखवायचे आहेत
- स्पर्धा मुंबईत पुढील चार केंद्रावर घेण्यात येईल.
  (१) दादर केंद्र (२) विलेपार्ले केंद्र (३) दहिसर केंद्र (४) सायन केंद्र
- भगवद्गीतापठण स्पर्धा रविवार दि. ११ डिसेंबर २०११ रोजी घेण्यात येईल.
- स्पर्धेत सहभागी झालेल्या प्रत्येक स्पर्धकास प्रमाणपत्र दिले जाईल.
- प्रत्येक केंद्रावर विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार बक्षिसांची संख्या ठरविण्यात येईल.साधारणपणे प्रथम तीन क्रमांक व दोन उत्तेजनार्थ अशी प्रत्येक गटातील प्रत्येक केंद्रावर पाच बक्षिसे असतील.
- शाळांनी या स्पर्धेत भाग घेतलेल्या मुलांच्या नावाची गटवार यादी १५ ऑक्टोबर २०११ पर्यंत खालीलपैकी कोणत्याही एका व्यक्तीकडे पाठवावी. विद्यार्थ्यांचे पूर्ण नांव, शाळेचे नांव व इयत्ता हा तपशील मराठीत लिहून पाठवावा.

**दादर केंद्र, सायन केंद्र**
**श्रीमती उज्ज्वला पवार (सचिव)**
६, मंदार, पहिला मजला,
द.स. बाबरेकर मार्ग,
जादुगार तायडे चौक,
दादर, मुंबई - ४०००२८.
दूरध्वनी - २४४६०२२४

**विलेपार्ले केंद्र**
**श्री. प्रसाद यशवंत कोचरेकर**
खतीजा कासम चाळ, खो.नं.२,
कबीरनगर, सहार रोड,
सिबा अपार्टमेंट मागे,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ४०००९९.
दूरध्वनी - ९८१९२८६००४

**दहिसर केंद्र**
**नम्रता राणे**
१०१ वैभव अपार्टमेंट,
बाभई राममंदिर रोड,
वझीरा नाक्यासमोर,
बोरिवली (प.), मुंबई - ४०००९२.
दूरध्वनी-२८९९९२७५/९८६९१६९९३४

**(श्रीमाधवराव भागवत हायस्कूल)**
**(मराठी माध्यम)**